
# जॅकलिन केनेडी ओनासिस



पी. मार्टिन
मराठी:
अश्विनी बर्वे

# जॅकलिन केनेडी ओनासिस

जॅकी बोव्हियर एक आनंदी लहान मुलगी होती. तिचे तिच्या कुटुंबावर, तिच्या आईवर, वडिलांवर आणि तिची बहीण लीवर खूप प्रेम होते.ती जिथे राहत होती ते मोठे घर तिला खूप आवडत होते. तिला सर्व प्राणी आवडत होते. आणि त्या सर्व प्राण्यांपैकी, कदाचित तिला घोडे सर्वात जास्त आवडत होते. ती पहिल्यांदा घोड्यावर कधी बसली हे तिला आठवत नव्हते, पण तो एक दिवस ती कधीही विसरणार नव्हती.




# जॅकलिन केनेडी ओनासिसिस

# जॅकलिन केनेडी ओनासिसि

पी. मार्टिन

मराठी: अश्विनी बर्वे





जॅकी बोव्हियर एक आनंदी लहान मुलगी होती. तिचे तिच्या कुटुंबावर, तिच्या आईवर, वडिलांवर आणि तिची बहीण लीवर खूप प्रेम होते. ती जिथे राहत होती ते मोठे घर तिला खूप आवडत होते.तिला सर्व प्राणी आवडत होते. आणि त्या सर्व प्राण्यांपैकी, कदाचित तिला घोडे सर्वात जास्त आवडत होते. ती पहिल्यांदा घोड्यावर कधी बसली हे तिला आठवत नव्हते, पण तो एक दिवस ती कधीही विसरणार नव्हती.



दुसऱ्या प्रयत्नात, जॅकी...ती पुन्हा एकदा आपल्या पायांवर उभी राहिली आणि घोड्यावर चढण्याचा प्रयत्न करू लागली.पण ती रकाबपर्यंत पोहोचू शकणार नाही इतकी लहान होती. पुन्हा उडी मारण्याचा निर्धार केलेल्या त्या मुलीला पाहण्यासाठी जमलेल्या सर्व लोकांनी जल्लोष केला.

ती घोड्यावर स्वार व्हायला शिकली. ती तिच्या घोड्यावर बसून कुंपणावरून उडी मारायला शिकली, आणि त्या दिवशी ती घोड्यांच्या स्पर्धेत भाग घेणार होती. जॅकी घोड्यांच्या स्पर्धेच्या रिंगणातून पहिल्या कुंपणाकडे गेली. उठून घोड्याने एक सुंदर उडी मारली, त्यात ती खाली पडली.





ते स्लेज मधून घरी जाऊ लागले.

जॅकी शाळेत असताना तिच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला होता. शाळेतून घरी आल्यावर जॅकी रविवारची वाट पाहत असे.





रविवारी बाहेर एक गाडी येऊन थांबायची आणि तिला चोरून हॉर्न वाजवल्याचा आवाज ऐकू यायचा. तो तिच्या वडिलांचा चोरून वाजवलेला हॉर्न होता. जॅकी आणि ली वडिलांना भेटायला बाहेर धावत जायचे. कधीकधी ते बागेत जायचे. तिथे त्यांचा दिवस मस्त मजेत जायचा. तिचे वडील आनंदी व्यक्ती होते.



नंतर जॅकीच्या आईने पुन्हा लग्न केले.
तिने ह्यू ऑकिनक्लॉसशी लग्न केले.
जॅकीच्या सावत्र वडिलांना तीन मुले होती.

त्यामुळे आता कुटुंबात पाच मुले झाली. आणखी
दोन मुले जन्माला आली आणि ते सात जण
झाले. त्या सर्वांनी एकत्र आनंदी वेळ घालवला
आणि जॅकीचे सावत्र वडील दयाळू व शहाणे होते.

शाळा च्या काम जॅकी च्या साठी पुरेसं सोपे होता.



तिला वाचायला आवडायचे. तिला लिहायला आवडायचे. तिला चित्रकला आवडायची आणि तिला भाषांचा अभ्यास करायला आवडायचे.



ती महाविद्यालयात गेली आणि एका वर्षानंतर, ती अभ्यासासाठी फ्रान्सला गेली. तिने फ्रेंच भाषेचा अभ्यास केला आणि ती अस्खलित फ्रेंच बोलायला शिकली.एक वेळ अशी येईल, जेव्हा जॅकलिनला इतर भाषा बोलता येणे ही किती अद्भुत गोष्ट आहे, हे सर्वांना कळेल.

जेव्हा ती फ्रान्सहून परत आली, तेव्हा तिला कामावर जायचे होते. ती वॉशिंग्टन, डी.सी. येथील एका वृत्तपत्रात कामाला लागली.



तिला रस्त्यात भेटलेल्या लोकांना ती प्रश्न विचारायची. आणि ते प्रश्न व त्यांची उत्तरे वृत्तपत्रात प्रसिद्ध केली जात. तिने मुलांना प्रश्न विचारले. तिने विचारलेल्या प्रश्नांपैकी एक हा होता: "फादर्स डेच्या दिवशी तुम्ही तुमच्या वडिलांना आनंदी करण्यासाठी काय करणार आहात?"



तिने सिनेटर्सना प्रश्न विचारले. त्या सिनेटर्सपैकी एक जॉन फिट्झगेराल्ड केनेडी होते.



जॅकलिन बोव्हियर आणि सिनेटर
जॉन फिट्झगेराल्ड केनेडी यांचा विवाह झाला.

ते एका फार्महाऊसमध्ये राहत असत.
लवकरच त्यांना एक मुलगी झाली तिचे
नाव त्यांनी कॅरोलिन ठेवले.



काळ पुढे सरकला, आणि अनेक लोकांना सिनेटर केनेडी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष व्हावेत असे वाटत होते.



सिनेटर केनेडीने लोकांना त्यांचे मत विचारले.

जॅकलिन केनेडीसुद्धा अनेकदा लोकांशी बोलल्या. एकदा त्या अनेक स्पॅनिश-भाषिक लोकांशी बोलल्या. त्या त्यांच्याशी स्पॅनिश भाषेत बोलल्या. त्यांनी त्यांना सांगितले की, जर त्यांनी जॉन फिट्झगेराल्ड केनेडी यांना मत दिले, तर व्हाईट हाऊसमध्ये त्यांना एक खरा मित्र मिळेल. लोकांना त्यांच्याच भाषेत बोलणाऱ्या व्यक्तीचे बोलणे ऐकून किती आनंद झाला होता, हे त्यांच्या प्रचंड जल्लोषावरून त्यांना समजले. दूरदर्शनवर त्या इटालियन लोकांशी इटालियन भाषेत बोलल्या. त्या फ्रेंच लोकांशी फ्रेंच भाषेत बोलल्या.




आणि जेव्हा सर्व लोकांनी मतदान केले, तेव्हा त्यांनी ठरवले की जॉन फिट्झगेराल्ड केनेडी हे अमेरिकेचे पुढील राष्ट्राध्यक्ष असतील.






ते राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी, आणि श्रीमती केनेडी व्हाईट हाऊसमध्ये राहायला जाण्यापूर्वी, त्यांचा मुलगा जॉन जन्माला आला होता.



जानेवारी १९६१ मधील एका थंड दिवशी, जेव्हा बर्फाचे ढीग साचले होते आणि सोसाट्याचा वारा वाहत होता, तेव्हा जॉन फिट्झगेराल्ड केनेडी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले आणि त्यांची तरुण पत्नी देशाच्या सुंदर प्रथम महिला बनल्या.

ते व्हाईट हाऊसमध्ये राहायला गेले. श्रीमती केनेडी आणि त्यांच्या मुलांनी एकत्र आनंदाचा काळ घालवला. कॅरोलिनसाठी एक घोडा होता, आणि नंतर जॉनसाठीही एक घोडा होता.



या घरात कुत्रे, मांजरे, बदके आणि मासे असे अनेक पाळीव प्राणी प्राणी होते.

कॅरोलिन तिच्या आईप्रमाणेच, अगदी लहान वयातच घोडेस्वारी करायला शिकली. कधीकधी श्रीमती केनेडी आपल्या मुलांना गोष्टी वाचून दाखवायच्या.



अनेक महत्त्वाचे लोक व्हाईट हाऊसला भेट द्यायला आले.असे ठरले की, जेव्हा महत्त्वाचे पुरुष भेट द्यायला येतील, तेव्हा विमानतळावर हेलिकॉप्टरने त्यांचे स्वागत केले जाईल. ते हेलिकॉप्टर त्यांना व्हाईट हाऊसपर्यंत घेऊन येईल. ते व्हाईट हाऊसच्या आवारात उतरेल.





हेदेखील ठरले की, जेव्हा महत्त्वाचे पुरुष येतील, तेव्हा हेलिकॉप्टर उतरताना तिथे कोणतीही महिला उपस्थित नसावी.

. जेव्हा पहिला महत्त्वाचा माणूस हेलिकॉप्टरने येणार होता, तेव्हा मिसेस केनेडींना माहित होतं की त्यांना ते पाहण्याची इच्छा होती.






म्हणून त्या बागेतील उंच वाढणाऱ्या झाडांमागे लपल्या. त्या तिथे लहान जॉनसोबत लपल्या, जेणेकरून तोही ते पाहू शकेल. हेलिकॉप्टर डोक्यावरून उडालं. मग, मिसेस केनेडी आणि जॉन पाहत असताना, ते हळूहळू व्हाईट हाऊसजवळ खाली उतरलं.

ज़ेव्हा महत्त्वाचे लोक व्हाईट हाऊसला भेट देत, तेव्हा प्रत्येकाला एक भेटवस्तू दिली जात असे.





श्रीमती केनेडी यांना देण्यासाठी एक परिपूर्ण भेटवस्तू शोधायची होती. योग्य भेटवस्तू शोधण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी पाहिले.

शेवटी, त्या स्मिथसोनियन संस्थेत गेल्या आणि तिथे त्यांना संपूर्ण अमेरिकेत आढळणारे सुंदर खडक दिसले..






तिथे पिवळे आणि तपकिरी, काळे आणि पांढरे असे सर्व रंगांचे खडक होते आणि त्यांना माहीत होते की अमेरिकेत आढळणाऱ्या खडकांपासूनच एक परिपूर्ण भेटवस्तू तयार केली जाऊ शकते.

अतिशय सुंदर वस्तू सापडल्या. त्यांना कापून, पॉलिश करून पेपरवेटमध्ये त्याचे रूपांतर केले गेले, त्यातून एक परिपूर्ण भेटवस्तू तयार झाली – राजासाठी एक भेट.

श्रीमती केनेडी यांनी व्हाईट हाऊसचा विचार केला, जिथे ते राहत होते. फार पूर्वी व्हाईट हाऊस सुंदर वस्तूंनी भरलेले होते. पण त्यापैकी अनेक वस्तू आता अस्तित्वात नव्हत्या. व्हाईट हाऊसचा जीर्णोद्धार व्हावा, असा श्रीमती केनेडींचा दृढनिश्चय होता. "मला हे अमेरिकेतील सर्वात परिपूर्ण घर बनवायचे आहे," त्या म्हणाल्या.





आणि ज्या दिवशी व्हाईट हाऊसची पुनर्बांधणी झाली. "व्हाईट हाऊस जसे असायला हवे, तसे आहे." ती म्हणाली. "मी जसे स्वप्न पाहिले होते, अगदी तसेच हे आहे - आता फक्त काही किरकोळ गोष्टी करायच्या बाकी आहेत."




आता व्हाईट हाऊस पूर्वीसारखेच सुंदर दिसत होते. शेकोट्या जळत होत्या आणि आगीच्या प्रकाशात चकचकीत जुने टेबल खूपच सुंदर दिसत होते.


जगातील महान व्यक्ती, चित्रकार आणि लेखक, संगीतकार आणि अभिनेते आणि इतर अनेक जण भेट देण्यासाठी येत असत.



श्रीमती केनेडी आणि राष्ट्राध्यक्षांनी एकत्र अनेक देशांना भेटी दिल्या. व्हिएन्नामध्ये श्रीमती केनेडी यांनी स्पॅनिश रायडिंग स्कूलचे पांढरे घोडे पाहिले.



Mrs. Kennedy and the President visited many countries together.In Vienna Mrs. Kennedy saw the white horses of the Spanish Riding School.





कॅनडामध्ये त्यांनी घोडेस्वार पोलिसांना त्यांच्या सुंदर घोड्यांवर पाहिले.

कधीकधी जेव्हा श्रीमती केनेडी बाहेरगावी जायच्या, तेव्हा राष्ट्राध्यक्ष त्यांच्यासोबत जाऊ शकत नसत. भारतात त्या आणि त्यांची बहीण ली हत्तीवरून फिरल्या.





श्रीमती केनेडी आठ काळ्या घोड्यांनी ओढलेल्या खुल्या रथातून प्रवास करत असत.

त्या  घोड्यावर स्वार झाल्या आणि नवी दिल्लीच्या अश्वारूढ रक्षकांच्या महान घोडेस्वारांसोबत त्यांनी उडी मारली.



आणि लोकांनी जयघोष केला आणि त्यांना हाक मारली, “अमेरिकेची राणी”




त्या जिथे जिथे गेल्या, तिथे त्यांना पाहण्यासाठी प्रचंड गर्दी जमली होती. आणि त्या नेहमी त्या गर्दीत मुलांना शोधत असे, कारण त्यांचे सर्व मुलांवर प्रेम होते.




२२ नोव्हेंबर, १९६३ रोजी, श्रीमती केनेडी आणि राष्ट्राध्यक्ष डॅलस, टेक्सास येथे होते. आणि ज्या रस्त्यांवरून ते जात होते, तिथे गर्दी जल्लोष करत होती, तेव्हा श्रीमती केनेडी नेहमीप्रमाणेच तिथे असलेल्या मुलांकडे लक्ष ठेवून होत्या.



तेव्हा अचानक तिला गोळीबाराचा
आवाज ऐकू आला - जॉन फिट्झगेराल्ड
केनेडी यांचा मृत्यू झाला होता.






जॅकलिन बोव्हियर केनेडी निघण्याच्या तयारीसाठी व्हाईट हाऊसमध्ये परत गेल्या. सर्व तयारी झाल्यावर त्यांनी कॅरोलिन आणि जॉन यांना बोलावले. जाण्याची वेळ झाली होती.

आकाश करड्या रंगाचे होते आणि वारा थंड होता. झाडांवरून वाळलेली पाने पडत होती आणि ती आई व तिची मुले एकत्र व्हाईट हाऊसच्या पायऱ्या उतरत होती.त्या राणीच्या ऐटीत चालत होत्या.






जगभरातील तिचे मित्र तिचा विचार करत होते. ते तिच्या सौंदर्याचा आणि तिच्या मोहकतेचा विचार करत होते. ते सर्व मुलांवरील तिच्या प्रेमाचा विचार करत होते. जगभरातील लोकांना वाटत होते की, तिने स्वतःसाठी आणि तिच्या मुलांसाठी एक चांगले आयुष्य मिळवावे. तो क्षण आला, जेव्हा ती कॅरोलिन आणि जॉनसोबत बर्फाळ पर्वताच्या उतारावरून स्कीइंग करत खाली उतरली.

कॅरोलिनने एका विशाल विमानवाहू जहाजाचे नामकरण केले, ते ती अभिमानाने पाहत होती. तिला संगीत आणि लोकांचा जल्लोष ऐकू येत होता. वर्षे लोटली होती.





आणि एके दिवशी जॅकलिन केनेडीने जगाला आश्चर्यचकित केले. तिने एका ग्रीक जहाजमालक, ॲरिस्टॉटल ओनासिसशी लग्न करण्याचे ठरवले होते.एका ग्रीक बेटावरील लहानशा चॅपेलमध्ये जॅकलिन केनेडी मिसेस ओनासिस बनल्या. चॅपेलच्या बाहेर हलका पाऊस पडत होता.

.लग्नानंतर श्रीमती ओनासिस, त्यांचे पती, त्यांची मुले आणि त्यांचे पाहुणे किनाऱ्याजवळ उभ्या असलेल्या एका भव्य नौकेवर चढले. आणि आता संपूर्ण जगाला हे कळून चुकले होते की.



अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची पत्नी बनलेल्या जॅकलिन बोव्हियर नावाच्या त्या मुलीच्या आयुष्यात पुढे काहीही वाढून ठेवले असले तरी, श्रीमती ओनासिस स्वतःसाठी आणि आपल्या मुलांसाठी एक चांगले आयुष्य घडवतील.

**समाप्त**